
2019-2020 C-III (1.)

SN 2394-5303

# Printing® Area

Issue-61, Vol-01 January 2020

Peer Reviewed International Refereed Research Journal



Editor

Dr.Bapu G.Gholap

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | January 2020 Issue-61, Vol-01 | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

January-2020, Issue-61, Vol-01


Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)



"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**

**Dr Gholap Bapu Ganpat**
Parli_Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**

saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**

Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**

115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**

vikaspadalkar@gmail.com
Cell. +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**

Navgan College, Parli V Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**

B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**

Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist:Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**

AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- **Krupa Sophia Livingston**

289/55, Vasanthapuram,
ICMC, Chinna Thirupathy Post,
Salem- 636008 +919655554464
davidswbts@gmail.com

- **Dr. Wagh Anand**

Dept. Of Lifelong Learning and Extension
Dr B A M U Aurangabad pin 431004
Mobi. 9545778985
wagh.anand915@gmail.com

- **Dr. Ambhore Shankar**

Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Ashish Kumar**

A-2/157, Sector-3, Rohini, Delhi -110085
*Ph.no:* 09811055359

- **Prof. Surwade Yogesh**

Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**

At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**

Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
patwarivm@rediffmail.com

- **Dr.Varma Anju**

Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr.Pramod Bhagwan Padwal**

Associate Professor,Department of Marathi
Banaras Hindu University,
Varanasi-221005.(Uttar Pradesh)
Mobi. 9450533466
pbpadwal@gmail.com

13) खेडा सत्याग्रह आणि सरदार पटेल
प्रा. गजानन बोरकर, जि. गडचिरोली ||70

14) ग्रामीण विकासाच्या भूमिकेचे अध्ययन
डॉ. नीता धर्माधिकारी, Nagpur ||74

15) शाश्वत विकासात पाण्याचे महत्त्व
डॉ. कल्पना भजनी & डॉ. कांचनमाला क्षीरसागर, नागपूर ||79

16) आरोग्य सेवेचा कणा असणा-या परिचारिकांची भूमिका
जयश्री दिगंबरराव पवार, जालना ||83

17) भारतातील शेतीची पिक रचना
प्रा. डॉ. संजय मगर, जि. औरंगाबाद ||87

18) परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर आणि बाललिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास
प्रा. डॉ. दयानंद उजळंबे, जि. परभणी ||90

19) लोकसाहित्यातील सामाजिक आणि भाषिक संकेत
प्रा. केशव धोंडिबा टिपरसे, जि. सांगली ||95

20) 'अरे भूमिपुत्रा' स्वकथनाची मीमांसा
प्रा. गणेश दिगंबर सावजी, जि. बुलडाणा ||99

21) विकास प्रक्रीयेतील स्त्रीयांचे प्रश्न
डॉ. अरुणा सावरगावकर, उस्मानाबाद ||102

22) वंचित जमातीचा सांस्कृतीक इतिहास
प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख, जि. उस्मानाबाद ||107

23) अकबर कालीन बावली (पिहानी, हरदोई) : एक ऐतिहासिक एवं पुरातात्विक सर्वेक्षण
डॉ० श्याम प्रकाश, छपरा ||112

24) शिक्षक के सर्वांगिण विकास मे डिजिटल शिक्षा की भूमिका
डॉ. रश्मि वर्मा, नीमच ||115

25) 'काली आँधी' और 'महाभोज' : एक तुलनात्मक अध्ययन
डॉ. अनिता प्रजापत, श्रीगंगानगर (राज.) ||117

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

18

# परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर आणि बाललिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास

प्रा. डॉ. दयानंद उजळंबे
संपादक : वृक्षवेली तथा उपप्राचार्य,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गंगाखेड, जि. परभणी

**********

1) प्रस्तावना :-

प्रस्तुत शोध निबंधामध्ये परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर आणि बाल लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास केला असून 2011 च्या त्यासाठी जनगणनेच्या आकडेवारीचा आधार घेतला असून परभणी जिल्ह्यात 1901 ते 2011 दरम्यान लिंग गुणोत्तरामध्ये झालेला बदलाचा अभ्यास केलेला असून 2011 च्या जनगणनेनुसार तालुकानिहाय लिंगगुणोत्तर , ग्रामीण - शहरी लिंग गुणोत्तर , 0 ते 06 वयोगटातील बाल लिंग गुणोत्तर , विशेषत: ग्रामीण आणि शहरी लिंग गुणोत्तरात झालेला बदल , लिंग गुणोत्तराच्या प्रमाणानुसार वस्त्याची संख्या, त्या वस्त्यामधील लोकसंख्येचे प्रमाण , तालुकानिहाय स्त्री - पुरुष साक्षरता, त्या मध्ये झालेला बदल . साक्षरतेच्या प्रमाणानुसार वसाहतीची संख्या, त्या वसाहतीलमधील असलेलली लोकसंख्या आणि लोकसंख्येच्या घनतेचा अभ्यास केलेला असून साक्षरतेचा परिणाम लिंगगुणोत्तावर कशा प्रकारे झालेला आहे , सोबतच परभणी जिल्ह्यातील भौगोलिक घटकाचा लिंग गुणोत्तरावर कशा प्रकारे झालेला आहे . भविष्यातील लिंगगुणोत्तराची स्थीती कशी राहील आणि त्यासाठी कशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील हा प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास आहे.

2) बीजसंज्ञा :- दशकनिहाय लिंग गुणोत्तर, लिंगगुणोत्तर प्रमाण आणि वसाहतीची संख्या, साक्षरता प्रमाण आणि वसाहतीची संख्या, लोकसंख्येची घनता .

3) उद्दिष्टये :-

1) परभणी जिल्ह्यातील दशकनिहाय लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे आणि त्यामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

2) तालुकानिहाय सरासरी लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे आणि त्यावर कोणत्या भौगोलिक घटकाचा परिणाम झालेला आहे याचा शोध घेणे .

3) परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर आणि साक्षरता, साक्षरतेच्या प्रमाणानुसार वसाहतीची संख्या आणि लोकसंख्या याचा अभ्यास करणे .

4) परभणी जिल्ह्यातील स्त्री - पुरुष साक्षरतेचा अभ्यास करुन त्यामधील फरकाचा अभ्यास करणे, या फरकामूळे लिंगगुणोत्तर झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

5) 0 ते 06 वयोगटातील ग्रामीण - शहरी लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे आणि भविष्यातील लिंगगुणोत्तरा संदर्भातील स्थिती जाणून घेणे.

4) अभ्यास पध्दती आणि सांख्यीकीय माहिती :-

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये लिंग परभणी जिल्ह्यातील गुणोत्तराचा अभ्यास केला असून वेगवेगळ्या देशामध्ये लिंग गुणोत्तर काढण्याच्या वेगवेगळ्या पध्दती आणि सुत्र असून भारतात लिंग गुणोत्तर काढण्यासाठी दर एक हजार पूरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण किती आहे. यावरुन लिंगगुणोत्तर काढले जाते याच पध्दतीचा वापर करुन लिंगगुणोत्तर काढलेले असून साक्षरतेचा दर टक्कवारीमध्ये काढलेला आहे. प्रस्तूत शोध निबंधासाठी लागणारी आकडेवारी भारतीय जनगणनेचा आधार घेतला असून वेगवेगळ्या संकेतस्थळाचाही आधार घेतलेला आहे. त्यामुळे या शोध निबंधामध्ये घेतलेली सांख्यीकिय माहिती दुय्यम स्वरुपाची असून जमा केलेल्या आकडेवारीचे सारणीकरण करुन माहितीच्या सादरीकरणासाठी आलेखीय पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

5) अभ्यास क्षेत्र :-

प्रस्तूत शोधनिबंधासाठी परभणी जिल्ह्याची निवड केली असून महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील परभणी जिल्हा महत्वाचा असून जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीमध्ये विविधता आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला हिंगोली आणि जालना जिल्हा असून. पुर्वेला नांदेड आणि हिंगोली जिल्ह्याच्या सीमा असून दक्षिणेला लातूर आणि बीड जिल्ह्याच्या सीमा आहेत. तर पश्चिमेला बीड आणि जालना जिल्ह्याच्या सीमा लाभलेल्या असून जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र 6214 चौ.किमी.असून 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या 1836086 असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या 2.02% क्षेत्र लाभले असून राज्याच्या लोकसंख्येच्या 1.63% लोकसंख्या परभणी जिल्ह्यात वास्तव्य करते, लोकसंख्येची सरासरी घनता 295 असून राज्यात भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिल्ह्याचा 26 वा क्रमांक लागतो, तर

लोकसंख्येनुसर 24 वा तर लोकसंख्येच्या घनतेनूसार 15 वा क्रमांक लागतो. परभणी जिल्ह्यात एकूण 9 तालुके असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने जिंतूर तालुका सर्वात मोठा तालुका असून भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान तालुका सोनपेठ आहे. जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती पाहता उत्तरेकडे जिंतूर डोंगररांगा पसरलेल्या असून मध्य भागात सपाट पठारी प्रदेश विस्तारलेला असून दक्षिणेकडे गंगाखेड तालुक्यात बालाघाटच्या डोंगररांगा पसरलेल्या आहे. जिल्ह्याची सर्वात जास्त उंची जिंतूर तालुक्यात 564 मिटर तर गोदावरी बेसीनमध्ये समुद्रसपाटीपासूनची उंची 366 मिटर असून जिल्ह्याचा सरासरी उतार दक्षिण पुर्व असा आहे.

परभणी जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार $18^{0}$ 40˙ उत्तर ते $19^{0}$ 55˙ उत्तर ते $70^{0}$ 10˙ पुर्व ते $77^{0}$ 15˙ पुर्व असा आहे.

**विश्लेषण:-**

परभणी जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचा अभ्यास करताना दशकनिहाय लिंगगुणोत्तर, तालुकानिहाय लिंगगुणोत्तर, ग्रामीण शहरी लिंगगुणोत्तर, 0 ते 06 वयोगटातील लिंगगुणोत्तर , साक्षरता, घनता, लिंगगुणोत्तराच्या प्रमाणानुसार वसाहतीची आणि लोकसंख्येची स्थिती, साक्षरतेच्या प्रमाणानुसार वसाहतीची आणि लोकसंख्येच्या स्थितीचा अभ्यास केलेला असून त्यासाठी वेगवेगळ्या सारणीचा पृथकरण आणि विश्लेषण केलेले आहे. यासाठी जनगणनेचा आधार घेतलेला आहे.

सारणी क्र. 1

परभणी जिल्ह्यातील दशकनिहाय लिंगगुणोत्तर

| वर्ष | महाराष्ट्र | | | परभणी जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लिंगगुणोत्तर | ग्रामीण | शहरी | सरासरी | ग्रामीण | शहरी |
| | | | | लिंगगुणोत्तर | | |
| 1901 | 978 | 1003 | 812 | 996 | 996 | 993 |
| 1911 | 966 | 1000 | 796 | 993 | 994 | 973 |
| 1921 | 950 | 994 | 776 | 978 | 892 | 946 |
| 1931 | 947 | 957 | 790 | 963 | 971 | 917 |
| 1941 | 949 | 989 | 810 | 960 | 965 | 930 |
| 1951 | 941 | 1000 | 807 | 974 | 978 | 956 |
| 1961 | 936 | 995 | 801 | 969 | 978 | 927 |
| 1971 | 930 | 985 | 820 | 954 | 966 | 909 |
| 1981 | 937 | 987 | 950 | 968 | 980 | 932 |
| 2001 | 922 | 960 | 873 | 958 | 968 | 937 |
| 2011 | 929 | 952 | 903 | 947 | 942 | 958 |

सदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना 1901 ते 2011

सारणी क्र. 1 वरुन असे निदर्शनास येते की, 1901 साली महाराष्ट्र राज्याचा सरासरी लिंगगुणोत्तर 978 होता तर ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तर 1003 तर शहरी भागातील लिंग गुणोत्तर 862होता तर याच वर्षी परभणी जिल्ह्यातील सरासरी लिंगगुणोत्तर 996 होता तर ग्रामीण भागातील लिंगगुणौततर सुध्दा 996 होता. त्या तूलनेत शहरी भागाचा लिंग गुणोत्तर 993 होता.राज्याचा आणि जिल्ह्याच्या लिंगगुणोत्ततराचा अभ्यास केला असता 1901 साली राज्याच्या लिंगगुणोत्तरापेक्षा जिल्ह्याचा लिंगगुणोत्तर 996 जास्त आहे. परंतू ग्रामीण भागातील राज्य आणि जिल्हा यातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता राज्यामध्ये लिंगगुणोत्तराचे प्रमाण जास्त आहे (1003) तर शहरी भागातील लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला असता राज्यापेक्षा (862) परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचे प्रमाण (993) जास्त आहे . परंतू ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तरापेक्षा शहरी भागात राज्यात आणि जिल्ह्यातही लिंगगुणोत्तराचे प्रमाण कमी आढळते ही शहराच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

1901 ते 2011 च्या राज्याच्या लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला असता 1901 पेक्षा 2011 मध्ये सरासरी लिंग गुणोत्तर - 49 ने घटले असून ग्रामीण भागातही - 52 ने लिंग गुणोत्तर घटले आहे तर शहरी भागात मात्र लिंगगुणोत्तर + 41 ने वाढले आहे. परभणी जिल्ह्यातील दशकनिहाय सरासरी लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला असता 1901 ते 2011 मध्ये परभणी जिल्ह्यात लिंग गुणोत्तर - 49 ने घटले असून ग्रामीण भागात लिंगगुणोत्तर ही - 52 ने घटले आहे तर शहरी भागात सुध्दा लिंग गुणोत्तर - 35 ने घटले असले तरी ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात लिंगगुणोत्तर वाढले असून जिल्ह्यात मात्र शहरी भागात लिंगगुणोत्तर कमी झालेले आहे मात्र ग्रामीण भागाच्या तूलनेत शहरी भागात लिंगगुणोत्तर कमी होण्याचे प्रमाण कमी आहे .

सारणी क्रमांक 2

परभणी जिल्ह्यातील तालूकानिहाय गिगुणोत्तर (2011)

| अ.क्र. | तालुका | सरासरी लिंगगुणोत्तर | ग्रामीण लिंगगुणोत्तर | शहरी लिंगगुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| 01 | सेलू | 953 | 956 | 944 |
| 02 | जिंतूर | 952 | 950 | 958 |
| 03 | परभणी | 954 | 942 | 962 |
| 04 | मानवत | 955 | 951 | 966 |
| 05 | पाथरी | 945 | 948 | 937 |
| 06 | सोनपेठ | 937 | 936 | 942 |
| 07 | गंगाखेड | 935 | 929 | 952 |
| 08 | पालम | 931 | 931 | 000 |
| 09 | पूर्णा | 943 | 937 | 970 |
| | परभणी जिल्हा | 947 | 942 | 958 |

संदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना - 2011 .

सारणी क्र. 2 अभ्यासला असता परभणी जिल्ह्यात 2011 च्या जनगणनेनुसार लिंगगुणोत्तर 947 असून ग्रामीण भागाचे 942 तर शहरी भागाचे 958 आहे. सरासरी लिंग गुणोत्तरापेक्षा ग्रामीण भागाचे लिंग गुणोत्तर 05 ने कमी असून शहरी भागात मात्र लिंग गुणोत्तरात जिल्ह्याच्या तूलनेमध्ये 11 नी वाढ झालेली आहे. परभणी जिल्ह्यात सर्वात जास्त लिंग गुणोत्तर मानवत (955), परभणी (954) तर सेलू (953) तालुक्यात असून कमी लिंग गुणोत्तर पालम (931), गंगाखेड (935) आणि सोनपेठ (937) तालूक्याचे असून हे तिन्ही जिल्हे परभणी जिल्ह्याच्या दक्षिणेकडे असून गंगाखेड, पालम आणि सोनपेठचा दक्षिणेकडचा काही भाग बालाघाट डोंगररांगानी व्यापलेला असून पर्जन्यात अनिश्चीतता वाहतूकीच्या शिक्षणाच्या सुविधेचा अभाव, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोई, गंगाखेड आणि पालमच्या काही भागात डोंगराळ व सूपीक जमिनीचा अभाव, निरक्षरता हे कारण लिंग गुणोत्तर कमी असण्याचे सांगता येतील.

परभणी जिल्ह्यात ग्रामीण लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असताही गंगाखेड (929), पालम (931), पूर्णा (937), सोनपेठ (936), या तालुक्यात लिंग गुणोत्तर प्रामुख्याने कमी आढळ्ते. आर्थीक परिस्थितीचा बराच परिणाम लिंग गुणोत्तर कमी होण्यामध्ये झालेला आहे. शहरी भागातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता पूर्णा शहरात (970) सर्वात जारत लिंग गुणोत्तर आहे. तर सर्वात कमी शहरी लिंगगुणोत्तर पाथरी शहरात (937) आढळ्ते.

सारणी क्र. 3

परभणी जिल्ह्यातील 0- 6 वयोगटातील बाल लिंगगुणोत्तर

| अ.क्र. | तालुका | सरासरी लिंग गुणोत्तर | ग्रामीण लिंग गुणोत्तर | शहरी लिंगगुणोत्तर |
|---|---|---|---|---|
| 01 | सेलू | 862 | 846 | 907 |
| 02 | जिंतूर | 894 | 890 | 913 |
| 03 | परभणी | 900 | 883 | 913 |
| 04 | मानवत | 880 | 883 | 874 |
| 05 | पाथरी | 873 | 870 | 882 |
| 06 | सोनपेठ | 824 | 822 | 831 |
| 07 | गंगाखेड | 870 | 859 | 907 |
| 08 | पालम | 884 | 884 | 000 |
| 09 | पूर्णा | 899 | 896 | 911 |
| | परभणी जिल्हा | 884 | 875 | 905 |

संदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना 2011

सारणी क्र. 3 मध्ये परभणी जिल्हयातील 0 ते 6 वयोगटातील सरासरी , ग्रामीण आणि शहरी लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला असता जिल्ह्यात 2011 च्या जनगणनेनुसार सरासरी लिंग गुणोत्तर 884 असून ग्रामीण भागत 875 तर शहरी भागात 905 लिंगगुणोत्तराचे प्रमाण असून सरासरी लिंग गुणोत्तरापेक्षा ग्रामीण भागत 9 ने लिंगगुणोत्तर कमी असून शहरी भागात 21 ने लिंग गुणोत्तरामध्ये वाढ झली असून सर्वात जास्त लिंगगुणोत्तर परभणी शहराचे असून सोनपेठ शहराचे सर्वात कमी लिंग गुणोत्तर आहे. ग्रामीण लिंग गुणोत्तरात सर्वात जास्त लिंग गुणोत्तर पूर्णा (896) तालुक्यात असून सर्वात कमी लिंग गुणोत्तर सोनपेठ तालुक्याचे आहे. शहरी लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला असता जिंतूर (913), परभणी (913) शहराचे लिंग गुणोत्तर अधिक असून सोनपेठ शहराचे (831) लिंग गुणोत्तर कमी आहे. प्रस्तूत सारणीच्या अभ्यासात सरासरी, ग्रामीण आणि शहरी भागात 0 ते 06 वयोगटातील लिंग गुणोत्तर सोनपेठ तालुक्यात खुपच कमी असून या तालुक्यात भविष्यात लिंग गुणोत्तर कमी होऊन वेगवेगळ्या सामाजिक समस्या निर्माण होऊ शकतात.

सारणी क्र. 4

परभणी जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराच्या प्रमाणावर वसाहतीची स्थिती

| लिंगगुणोत्तर प्रमाण | वसाहती | वसाहतीचे शेकडा प्रमाण (%) | लोकसंख्या | लोकसंख्येचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 700 पेक्षा कमी | 03 | 0.36 | 1733 | 0.14 |
| 700 ते 749 | 01 | 0.12 | 603 | 0.05 |
| 750 ते 799 | 06 | 0.72 | 6388 | 0.5 |
| 800 ते 849 | 17 | 2.05 | 12313 | 0.97 |
| 850 ते 899 | 126 | 15.18 | 146735 | 11.59 |
| 900 ते 949 | 312 | 37.59 | 533653 | 42.14 |
| 950 ते 999 | 258 | 31.08 | 474300 | 37.46 |
| 1000 ते 1099 | 101 | 12.17 | 87975 | 6.95 |
| 1000 पेक्षा जास्त | 06 | 0.72 | 2580 | 0.2 |

संदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना 2011

सारणी क्र. 4 मध्ये परभणी जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचे प्रमाण आणि वसाहती, तेथील लोकसंख्या आणि लोकसंख्येच्या टक्केवारीचा अभ्यास केला असता 900 ते 949 या लिंगगुणोत्तराच्या गटामध्ये सर्वाधिक वसाहती (312) असून त्याचे शेकडा प्रमाण 37.59% आहे . या वसाहतीची एकूण लोकसंख्या 42.14% असून जवळपास 900 ते 999 या लिंग गुणोत्तराच्या गटात 570 वसाहती असून याच गटात असणाऱ्या वसाहतीतील लोकसंख्येचे प्रमाणे 79.66% इतके आहे . 1000 लिंग गुणोत्तर असणाऱ्या परभणी जिल्ह्यात 06 वसाहतीचे शेकडा 0.72% प्रमाण

असून या लिंगगुणोत्तराच्या गटात वसाहतीची संख्या आणखीन वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या गरज आहे. 700 पेक्षा कमी लिंग गुणोत्तर असणाऱ्या वसाहतीची संख्या केवळ 3 असली तरी या गावात लिंग गुणोत्तर वाढण्यासाठी विशेष प्रयत्नाचीही गरज आहे .

सारणी क्र. 5

परभणी जिल्ह्यातील साक्षरता आणि स्त्री - पुरुष साक्षरतेतील फरक % मध्ये

| अ.क्र. | तहसील | साक्षरतेचा दर % मध्ये | पुरुष साक्षरता दर % | स्त्री साक्षरता दर % | पुरुष - स्त्री साक्षरतेमधील फरक % मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 01 | सेलू | 69.15 | 80.79 | 57.22 | 23.57 |
| 02 | जिंतूर | 69.92 | 80.21 | 58.6 | 21.61 |
| 04 | मानवत | 70.46 | 81.74 | 58.73 | 23.01 |
| 05 | पाथरी | 68.11 | 78.78 | 57.01 | 21.77 |
| 06 | सोनपेठ | 68.61 | 79.5 | 57.23 | 22.27 |
| 07 | गंगाखेड | 71.01 | 81.84 | 59.2 | 22.4 |
| 08 | पालम | 71.94 | 82.7 | 60.48 | 22.22 |
| 09 | पूर्णा | 71.8 | 82.26 | 60.27 | 21.99 |
| परभणी जिल्हा | | 70.28 | 81.08 | 58.96 | 22.12 |

संदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना 2011

सारणी क्र. 5 चा अभ्यास केला असता 2011 च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याची सरासरी साक्षरतेची टक्केवारी 70.20% असून पुरुष साक्षरता 81.08% तर ग्रामीण साक्षरता केवळ 58.96% असून पुरुष आणि स्त्री साक्षरतेधील फरक (Gap) 22.12 असून स्त्री साक्षरतेचा दर पुरुष साक्षरतेच्या तुलनेत खुपच कमी आहे.

एकूण साक्षरतेचा दर पुरुष साक्षरतेच्या तलुनेत खुपच कमी आहे. एकूण साक्षरतेच्या तलुनेत पुरुष साक्षरतेचे प्रमाण 10.8% अधिक असून स्त्री साक्षरतेचे प्रमाण 11.32 ने कमी आहे. तालुका निहाय साक्षरतेचा अभ्यास केला असता पालम (71.94%), पूर्णा (71.58%) तालुक्याचे साक्षरतेचे प्रमाण जासत असून पाथरी (68.11%) , सोनपेठ (68.61%) तालुक्याचे सरासरी साक्षरतेचे प्रमाण कमी आहे . पुरुष साक्षरतेमध्ये पालम (82.70%), पुर्णा (82.26%) तालुका अग्रेसर असून पाथरी (78.78%), तर सोनपेठ (79.50%) तालुक्यात इतर तालुक्याच्या तुलनेत साक्षरतेचे प्रमाण कमी आहे . स्त्री साक्षरतेच्या अभ्यास केला असता येथेही पालम (60.48%), पुर्णा (60.27%) तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण अधिक असून पाथरी (57.01%), सेलू तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण अधिक असून पाथरी (57.01%), सेलू (57.22%), सोनपेठ (57.23%) तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे . जिल्ह्यात सर्वात जास्त पुरुष-स्त्री साक्षरतेमधील फरक सेलू (23.57%) तालुक्यात असून गंगाखेड (22.34%), पालम (22.22%), तर सोनपेठ (22.27%) तालुक्यात आहे. जिल्ह्यात साक्षरतेचा एकंदरीत आढावा घेतला असाता पालम, पुर्णा, गंगाखेड तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण जास्त असले तरी सेलू, गंगाखेड, पूर्णा, पालम, सोनपेठ या तालुक्यात पुरुष आणि स्त्री साक्षरतेमध्ये फरक जासत असून सेलू आणि सोनपेठ तालुका आर्थीक दृष्ट्या सदन, सूर्पीक मृदेमुळे स्त्री साक्षरतेकडे येथे लक्ष दिले गेले नाही. सोबतच सोनपेट तालुक्यात प्रति कुंटूब जमिनीचे प्रमाण जास्त असल्यामुळे, भौगोलिक दृष्ट्या सूपीक प्रदेश असल्यामुळे, सोबतच स्त्रीयाकडे शिक्षणाकडे दुय्यम दर्जानी पाहिल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते. त्यामुळे जिल्ह्यात सानेपेठ तालुक्यात लिंगगुणोत्तर (सरासरी, शहरी, ग्रामीण) कमी आढळते.

सारणी क्र. 7 चा अभ्यास केला असता परभणी जिल्ह्यात एकूण 830 गावे असून 51% ते 60% साक्षरता असणाऱ्या गावाची संख्या 36 असून 2.56% लोकसंख्या वास्तव्य करते तर 61% ते 70% साक्षरता असणाऱ्या असणाऱ्या गावाचे प्रमाण 364 असून एकूण गावाच्या 43.86% प्रमाण आहे. 100% साक्षरता असणारे फक्त 2 गावे (वसाहती) असून एकूण गावाच्या आकडेवारीमध्ये त्याचे प्रमाण 0.24% आहे. तर 0 ते 30% साक्षरता असणाऱ्या गावाचे प्रमाण 0 आहे . 2011 च्या जनगणनेनुसार 81% ते 100% साक्षरता असणाऱ्या गावामध्ये केवळ 1.12% लोकसंख्या आढळते. प्रस्तूत सारणीवरुन परभणी जिल्ह्यात 51% ते 80% साक्षरता असणाऱ्या खेड्याची आणि लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. लिंग गुणोत्तर परभणी जिल्ह्यात कमी होण्याचे एकंदरीतच परभणी जिल्ह्यात 81% पेक्षा जास्त साक्षरता (स्त्री - पुरुष) असणाऱ्यांचे प्रमाण कमी असल्यामुळे जिल्ह्यामध्ये लिंगगुणोत्तर कमी - कमी होत आहे. तर दुसरीकडे भारतात सरचीप 97.91 , ऐजवाल 97.89 माहे 97.87 , कोट्टम (97.21)पटनमतिता जिल्ह्यात 96.55 साक्षरता आहे . त्यामुळे परभणी जिल्ह्यात साक्षरता दर वाढविणे गरजेचे आहे .

सारणी क्र. 7

परभणी जिल्ह्यातील साक्षरतेच्या प्रमाणावरुन असलेली खेड्यांची संख्या

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | January 2020 Issue-61, Vol-01 

| अ.क्र. | साक्षरता गट टक्केवारी मध्ये | वसाहती (खेड्यांची संख्या) | वसाहतींची टक्केवारी | साक्षरतेच्या प्रमाणानुसार | लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 0-10 | 00 | 00 | 00 | 00 |
| 02 | 11-20 | 00 | 00 | 00 | 00 |
| 03 | 21-30 | 00 | 00 | 00 | 00 |
| 04 | 31-40 | 02 | 0.24 | 1463 | 0.12 |
| 05 | 41-50 | 02 | 0.24 | 884 | 0.07 |
| 06 | 51-60 | 36 | 4.34 | 32365 | 2.56 |
| 07 | 61-70 | 364 | 43.86 | 622472 | 49.16 |
| 08 | 71-80 | 392 | 47.23 | 587275 | 16.38 |
| 09 | 81-90 | 29 | 3.49 | 20768 | 1.04 |
| 10 | 91-99 | 03 | 0.36 | 1053 | 0.08 |
| 11 | 99 पेक्षा जास्त | 02 | 0.24 | 3 | 00 |
| | | 830 | 100 | 1266280 | 100 |

संदर्भ :- परभणी जिल्हा जनगणना 2011

निष्कर्ष :-

1) परभणी जिल्ह्याचे 1901 ते 2011 दरम्यान लिंग गुणोत्तराची राज्याच्या लिंगगुणोत्तराशी तुलना केली असता राज्य आण परभणी जिल्ह्यात 49 ने लिंगगुणोत्तर घटले आहे , जिल्ह्यातील ग्रामीण भागात 52 तर शहरीभागात 35 ने लिंगुणेत्तर कमी झलेले आढळते, ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात लिंग गुणोत्तर कमी होण्याचे प्रमाण कमी आहे हे शहरी भागाची जमेची बाजू आहे. भारतात 2011 मध्ये सरासरी लिंग गुणोत्तर 940, महाराष्ट्राचा 929 तर परभणी जिल्ह्याचा लिंग गुणोत्तर 947 असून देशाचा आणि राज्याच्या तुलनेत परभणी जिल्ह्याचा लिंगगुणोत्तराचा दर अधिक आहे.

2) परभणी जिल्ह्यात ग्रामीण भागातील लिंग गुणोत्तरापेक्षा शहरी भागात लिंग गुणोत्तराचे प्रमाण अधिक आढळते. शहरी भागात स्त्रीयांना शिक्षणाकडे पाहाण्याचा सकारात्मक दृष्टीकोनामुळे लिंग गुणोत्तर वाढल्याचे दिसून येते.

3) परभणी जिल्ह्यातील पालम, गंगाखेड, सोनपेठ तालुक्यात लिंगगुणोत्तर इतर तहसीलपेक्षा कमी आढळते. हीच परिस्थिती ग्रामीण भागातही आढळते. पाथरी शहरात स्त्रीयाकडे दुय्यम दर्जाची वागणुक दिल्यामुळे इतर तालुकापेक्षा लिंग गुणोत्तर कमी आहे .कारण येथील जमिनदारी पध्दतीमुळे स्त्रीयांना शिक्षण देण्याकडे जनतेचा कलच नसल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण कमी आढळते .

4) 0 ते 06 वयोगटातील बाल लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता सोनपेठ मध्ये लिंग गुणोत्तर कमी आहे, तसेच याच तालुक्यात ग्रामीण आणि शहरी भागातही लिंग गुणोत्तराचे प्रमाण इतर तालुक्यापेक्षा कमी आहे .

5) लिंग गुणोत्तराच्या प्रमाणानुसार परभणी जिल्ह्यात सर्वाधिक लिंगगुणोत्तर 900 ते 950 या दरम्यान 312 गावे असून लोकसंख्येचे प्रमाण प्रस्तूत गावामध्ये 42.14%आहे .

6) परभणी जिल्ह्यातील साक्षरतेचा दर अभ्यासला असता पुरुषापेक्षा स्त्रीयांच्या साक्षरता दर खुपच कमी आहे. विशेषत: गंगाखेड, पालम, सोनपेठ तालुक्यात स्त्री साक्षरतेचा दर खुपच कमी आहे .

7) साक्षरतेच्या प्रमाणावरुन सर्वात जास्त साक्षर गावे (खेडे) असणारे 392 असून येथे 71% ते 80% साक्षरता आढळते. 91% पेक्षा जास्त साक्षर असणाऱ्या खेड्याची संख्या केवळ 5 आहे .

उपाय :-

2011 च्या राष्ट्रीय जनगणेनुसार देशाच्या आणि महाराष्ट्राच्या तलुनेमध्ये परभणी जिल्ह्याचा साक्षरतेचा दर समाधानकारक असला तरी जिल्ह्यात लिंगगुणोत्तराचे प्रमाण (1901 ते 2011) दशकनिहाय कमी झाल्याचे प्राप्त आकडेवारीवरुन दिसते. विशेषत: शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात लिंग गुणोत्तर कमी असून गंगाखेड, पालम, पूर्णा, आणि सोनपेठ तालुक्यात लिंगगुणोत्तर खुपच कमी आहे. 0 ते 06 वयोगटात तर त्याहीपेक्षा गंभीर स्थिती असून प्रति 1000 पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण वाढविण्यासाती ग्रामीण भागात विशेष लक्ष देणे आवश्यक असून शासणाच्या विविध योजना, स्त्री साक्षमीकरणासाठी प्रयत्न, स्त्रीयांना कुंटूंबात विशेष दर्जा, सरकारी योजनेमध्ये स्त्रीयांना अधिकच्या संधी. सोबतच महिला ई- हात, बेटी बचाव, बेटी पढाव, वन स्टॉप सेंटर स्कीम वर्कींग उमन हॉस्टेल, स्वाधार गृह, स्टेप, नारी शक्ती पुरस्कार योजनेची जिल्ह्यत अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. आर्टिकल 15(3) ची अमलबजावणी, संविधानातील तरतूद कलम 15(3) नुसार महिलांना समानतेच्या अधिकाराबद्दलची अंमलबजावणी करने तसेच महिला बदलच्या धोरण 39(9) नुसार महिलांना संरक्षण, समानतेचा अधिकार देण्यासंदर्भात नियमाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात सुधारणा करुन स्त्रीभ्रूणहत्यावर प्रतिबंध घालणे, मुलगी होणाऱ्या कुंटूंबाला अर्थसहाय्य देणे, बेटी बचाव बेटी पढाव योजनेला गती आणणे, मूलींच्या लग्नासाठी शासनातर्फे विशेष योजना आणने, स्त्रीयांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम वागणुकीवर आळा घालणे, महिलांच्या आरोग्यासाठी विशेष प्रयत्न करणे, गरजेचे आहे.

स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात शासकीय सुविधा आणि सन्मान

19

परभणी जिल्ह्यात मिळणे गरजेचे आहे. विशेषत: 0 ते 6 वयोगटातील मुलींच्या शिक्षणाकडे आणि त्यांच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

संदर्भ :-

http :// Censusindia.gov.in(2011)
http://indiakosh.com
http://censushandbookparbhanidistrict
https://cdn.53wqs.gov.in
http://www.census2011.co.in

❑❑❑